महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- 400 001 . दुरध्वनी क्र. 022-22620304
Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-मराकशिमं-२०२४/संलग्नता परिपत्रक/ १६५ दिनांक:- ०२.०८.२०२४

परिपत्रक

प्रति,

१. अधिष्ठाता/प्राचार्य, शासकीय कला परिसंस्था,

२. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था.

**विषय:- पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या कला संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेणेबाबत.**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र अधिनियम क्र. १२, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचा अधिनियम २०२३ दि. १९.०१.२०२४.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे दिनांक २६.०७.२०२४ रोजीचे पत्र.

संदर्भ १. मध्ये मंडळाच्या अधिनियमातील कलम २५ मध्ये परिसंस्थेची संलग्नता संबंधी बाबी नमूद केलेल्या आहेत. तसेच कलम २७ मध्ये संलग्नतेचे कार्यपध्दती नमूद केलेली आहे. सदर अधिनियमातील कलम २५ व २७ नुसार महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित कला संस्थांनी आपल्या संस्थेतील अभ्याक्रमनिहाय संलग्नता घेणे बंधनकारक आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये शासनाने खालील प्रमाणे संलग्नता शुल्क घेण्यास मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी (वर्ष) | संलग्नता शुल्क (रु.) प्रति वर्ष |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत | १ | १५०००/- |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण (अे.टी.डी.) | २ | १५०००/- |
| ३ | रेखा व रंगकला, | ४ | २५०००/- |
| ४ | उपयोजित कला, | ४ | २५०००/- |
| ५ | शिल्पकला व प्रतिमानबंध, | ४ | २५०००/- |
| ६ | अंतर्गत गृहसजावट, | २ | १५०००/- |
| ७ | वस्त्रकाम (टेक्सटाईल) | २ | १५०००/- |
| ८ | मातकाम (सिरॅमिक व पॉटरी) | २ | १५०००/- |
| ९ | धातुकाम (मेटल वर्क) | २ | १५०००/- |
| १० | कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) | १ | १५०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | आर्ट मास्टर (प्रमाणपत्र) ((सुट्टीतील/अंशकालीन)) | ३ (सुट्टीतील) / १(अंशकालीन) | १५०००/- |

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित कला संस्थांनी पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमनिहाय दि. १४.०८.२०२४ पर्यंत संलग्नता घ्यावी.

संस्थांनी संलग्नते संबंधिची माहिती मंडळाच्या www.msbae.org.in या संकेत स्थळावरून Affiliation मेनू मध्ये https://doaonline.in/institute-login या लिंकवरून ऑनलाईन पध्दतीने अचूक माहिती भरावी. संलग्नतेसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे संगणक प्रणालीद्वारे अपलोड करावीत व सर्व कागदपत्रासह नस्ती सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ यांचेकडे दि. १८.०८.२०२४ पर्यंत जमा करावी. शासनाची मान्यता असलेल्या कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना संलग्नता देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. संलग्नता शुल्क ऑनलाईन पध्दतीने Payment Gateway द्वारे स्विकारण्यात येणार आहे.

मंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार संलग्नता घेणाऱ्या संस्थेस अटी व शर्तीचे पालन संस्था करेल याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक आहे. हमीपत्राचा नमुना व संस्थेने करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. कला संस्थांना मंडळाने प्रत्येक संस्थेस कोड (क्रमांक) दिलेला आहे. त्याची माहिती मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

संलग्नतेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेने विद्यार्थ्यांचे नामांकन ऑनलाईन पध्दतीने दि. २२.०८.२०२४ पर्यंत करावे. शासनाने दि. २६.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार नामांकन शुल्क प्रति विद्यार्थी रु. २००/- राहील. विद्यार्थ्यांचे नामांकन करावयाची लिंक मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

ज्या कला संस्था अभ्यासक्रमांना संलग्नता घेणार नाहीत, त्या संस्थेवर महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत:- १. हमीपत्राचा नमुना
२. संलग्नतेसाठीच्या अर्जाचा नमुना

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

१. प्रत माहिती व कार्यवाही करीता: उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर.
२. निवड नस्ती.

(रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोटरी केलेले)

(शासकीय कला संस्थांनी सादर करावयाच्या हमीपत्राचा नमूना)

# हमीपत्र

मी--------------------------------- (प्राचार्य/अधिष्ठाता यांचे नाव) ------------------------ या (संस्थेचे नाव) प्राचार्य/अधिष्ठाता आहे. सदर कला महाविद्यालयात कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात. सदर अभ्यासक्रमांना मंडळाचे संलग्नता घेण्याकरीता पुढील शर्तींचे अनुपालन करील व तशा अर्थाची हमी देत आहे:

(क) अधिनियम आणि त्याखालील विनियम यांच्या तरतुदींचे आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे व निदेशांचे पालन करण्यात येईल ;

(ख) अभ्यास पाठ्यक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने व शासनाने, वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ग) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे इमारती, कार्यशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या सुयोग्य व पर्याप्त भौतिक सुविधा असतील;

(घ) परिसंस्थेची वित्तीय संसाधने ही, ती नियमितपणे चालविण्यासाठी व तिचे कामकाज करण्यासाठी पुरेशी तरतूद करणारी असेल ;

(ङ) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न परिसंस्थांच्या कर्मचाऱ्यांची वित्तलब्धी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या, मंडळाद्वारे व नियामक प्राधिकरणाद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील आणि त्या, अभ्यास पाठ्यक्रम,अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(च) सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि त्या परिसंस्थेच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी व मूल्यमापनासाठी आणि मंडळाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(छ) या अधिनियमाच्या तरतुदी आणि विनियम या अन्वये, मंडळाच्या संचालकाने व इतर अधिकाऱ्यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(ज) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा त्याचे हस्तांतरण करण्यात येणार नाही ;

(झ) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय परिसंस्था बंद करण्यात येणार नाही ;

(ञ) मंडळाच्या अधिनियमातील कलम ३२ किंवा, यथास्थिति, कलम ३६ या अन्वये कला परिसंस्थेची संलग्नता रद्द केल्याच्या किंवा मान्यता काढून घेतल्याच्या किंवा बंद केल्याच्या प्रसंगी, शासनाने सहायक अनुदान म्हणून प्रदान केलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या इमारती व साधनसामग्री यांसह परिसंस्थेच्या सर्व मत्ता शासनाकडे निहित होतील.

दिनांक:
ठिकाण

संस्थेचा शिक्का

प्राचार्य/अधिष्ठाता यांचे नाव व स्वाक्षरी
संस्थेचे नाव व पत्ता

(रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोटरी केलेले)

(अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थानी करावयाच्या हमीपत्राचा नमूना)

# हमीपत्र

मी-------------------------------- (नाव) ------------------------ ट्रस्टचा अध्यक्ष/सचिव आहे. माझे ----------------- -- हे कला महाविद्यालय आहे. सदर कला महाविद्यालयात कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात. सदर अभ्यासक्रमांना मंडळाचे संलग्नता घेण्याकरीता पुढील शर्तींचे अनुपालन करील व तशा अर्थाची हमी देत आहे:

(क) अधिनियम आणि त्याखालील विनियम यांच्या तरतुदींचे आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे व निदेशांचे पालन करण्यात येईल ;

(ख) अभ्यास पाठ्यक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने व शासनाने, वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ग) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे इमारती, कार्यशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या सुयोग्य व पर्याप्त भौतिक सुविधा असतील;

(घ) परिसंस्थेची वित्तीय संसाधने ही, ती नियमितपणे चालविण्यासाठी व तिचे कामकाज करण्यासाठी पुरेशी तरतूद करणारी असेल ;

(ङ) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न परिसंस्थांच्या कर्मचाऱ्यांची वित्तलब्धी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या, मंडळाद्वारे व नियामक प्राधिकरणाद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील आणि त्या, अभ्यास पाठ्यक्रम,अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(च) सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि त्या परिसंस्थेच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी व मूल्यमापनासाठी आणि मंडळाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(छ) या अधिनियमाच्या तरतुदी आणि विनियम या अन्वये, मंडळाच्या संचालकाने व इतर अधिकाऱ्यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(ज) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा त्याचे हस्तांतरण करण्यात येणार नाही ;

(झ) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय परिसंस्था बंद करण्यात येणार नाही ;

(ञ) मंडळाच्या अधिनियमातील कलम ३२ किंवा, यथास्थिति, कलम ३६ या अन्वये कला परिसंस्थेची संलग्नता रद्द केल्याच्या किंवा मान्यता काढून घेतल्याच्या किंवा बंद केल्याच्या प्रसंगी, शासनाने सहायक अनुदान म्हणून प्रदान केलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या इमारती व साधनसामग्री यांसह परिसंस्थेच्या सर्व मत्ता शासनाकडे निहित होतील.

दिनांक:
ठिकाण

ट्रस्ट/सोसायटी
चा शिक्का

अध्यक्ष/सचिव यांचे नाव व स्वाक्षरी
ट्रस्ट/सोसायटी नाव व पत्ता

<u>शासकीय कला संस्थेने संलग्नेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना</u>

(लेटरहेडवर)

प्रति,

सचिव,

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,

मुंबई.

**विषय:- कला संस्थेतील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संलग्नता देणेबाबत.**

महोदय,

मी-------------------------------------------- प्राचार्य/अधिष्ठाता अर्ज करतो की, माझ्या ------------- या संस्थेतील खालील कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता देण्यात यावी.

| अ.क्र | पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | शासनमान्य प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |

सदर अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची/ कला संचालनालयाची मान्यता आहे. संलग्नतेची माहिती मी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरली आहे. तसेच संलग्नतेसाठी आवश्यक शुल्क भरलेले आहे. संलग्नतेसाठी आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत. कला संस्थेतील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संलग्नता देणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

कला संस्थेचा
शिक्का

प्राचार्य/अधिष्ठाता यांचे नाव व स्वाक्षरी
कला संस्थेचे नाव व पत्ता

## (अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थेने संलग्नेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना)

(व्यवस्थापनाच्या लेटरहेडवर)

प्रति,

सचिव,

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,

मुंबई.

**विषय:- कला संस्थेतील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संलग्नता देणेबाबत.**

महोदय,

मी------------------------------------------ अध्यक्ष/सचिव अर्ज करतो की, माझ्या ट्रस्टच्या ------------ या संस्थेतील खालील कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता देण्यात यावी.

| अ.क्र | पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | शासनमान्य प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |

सदर अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची/ कला संचालनालयाची मान्यता आहे. संलग्नतेची माहिती मी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरली आहे. तसेच संलग्नतेसाठी आवश्यक शुल्क भरलेले आहे. संलग्नतेसाठी आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत. कला संस्थेतील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संलग्नता देणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

ट्रस्ट/सोसायटी चा शिक्का

अध्यक्ष/सचिव यांचे नाव व स्वाक्षरी

ट्रस्ट/सोसायटीचे नाव व पत्ता